**सुभाषित :**

स्तोकेनोन्नतिमायाति स्तोकेनायात्यधोगतिम् |
अहो सुसदृशी वृत्तिः तुलाकोटेः खलस्य च ||

**अर्थ :**

अहो! तराजूची दांडी आणि दुष्टाचे वागणे किती सारखे आहे बरे! थोड्याशा कारणाने (तागडीच्या बाबतीत वजनाने) वर चढतो (संतुष्ट होतो, त्याला गर्व होतो) आणि अगदी थोड्याने खाली जातो. (जरा कमी फायदा वाटला तर दुष्ट खालच्या थराला जाऊन नुकसान करतो.)